# वाणिज्य मंडळ

# २०१४-१५



# वार्षिक कार्यक्रम

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रम | व्याख्याते |
|---|---|---|---|
| १ | ११/११/२०१४ | करिअर इन बँकिंग | श्री. हितेश कुमार |
| २ | १२/११/२०१४ | उद्योजक आपल्या भेटीला | श्री. जय पठारे |
| ३ | १३/११/२०१४ | करिअर इन कॉम्प्यूटर | श्री. जहूर बोट |
| ४ | २१/११/२०१४ | बँक आपल्या भेटीला | श्री. सुरनिस साहेब |
| ५ | १२/१२/२०१४ | उद्योजक आपल्या भेटीला | श्री. मोहनशेठ संसारे |
| ६ | १६/१२/२०१४ | उद्योजक आपल्या भेटीला | श्री. राजन दळी |
| ७ | १८/१२/२०१४ | जागो ग्राहक जागो | श्री. चंद्रकांत झगडे |
| ८ | २१/१२/२०१४ | उद्योजक आपल्या भेटीला | श्री. शाळीग्राम खातू |
| ९ | ०६/०१/२०१५ | पत्रकार दिन साजरा | सर्व पत्रकार |
| १० | ११/०२/२०१५ | खाद्यमहोत्सव | वर्ष तिसरे |
| ११ | ११/०२/२०१५ | सोसल मिडियावर कार्यक्रम | श्री. सत्यप्रकाश चव्हाण |

# करिअर इन बँकिंग - हितेश कुमार

दि.११ नोव्हेंबर २०१४ रोजी बँकिंग क्षेत्राविषयी माहिती देण्यासाठी सिंडिकेट बँकेचे अधिकारी श्री. हितेश कुमार व त्यांचेसोबत श्री. अभिषेक पवार उपस्थित होते.या दोघांचेही स्वागत वाणिज्य मंडळाच्या ग्रंथपाल कु. भक्ती महाडीक हिने केले. २०२० पर्यंत बँकिग क्षेत्रात करिअर करण्याची मोठी संधी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार असल्याचे प्रतिपादन श्री. हितेशकुमार यांनी केले. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग, केंद्रिय लोकसेवा आयोग, रेल्वे, विमा या क्षेत्रात किती व कशाप्रकारच्या नोकरीच्या मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत याची योग्यप्रकारे माहिती दिली. तसेच २०२० पर्यंत मोठ्या प्रमाणावर पदे भरली जाणार असून त्याची तयारी महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षापासूनच करावी असे त्यांनी आवाहन केले. त्यांचा असणारा अभ्यासक्रम व अभ्यासक्रमातील घटक, त्यांची तयारी तसेच परिक्षांचे अर्ज, त्याची मुदत, असणारे वेतन व इतर मिळणाऱ्या सुविधा यासाठी आवश्यक असणारी वयोमर्यादा, परिक्षेचा कालावधी या विषयी माहिती देत बँक परिक्षा घेणारी आय.बी.पी.एस. संस्था, त्याची वेबसाईट, बँकेच्या परिक्षेची तयारी करण्याचे तंत्र याविषयी माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची त्यांनी उत्तरे दिली. सदर कार्यक्रमाचा समारोप प्राचार्य एस.एस. खोत यांनी केले.





# विद्यार्थ्यांनी व्यवसायाकडे वळावे -श्री. जय पठारे

दि.१२ नोव्हेंबर २०१४ रोजी वाणिज्य मंडळाकडून विद्यार्थ्यांनी नोकरीपेक्षा व्यवसायाकडे लक्ष द्यावे असे आवाहन प्रसिध्द दद्योजक श्री. जय पठारे यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहूण व्याख्यान देण्यासाठी श्री. जय पठारे यांना निमंत्रित करण्यात आले होते. सोबत त्यांच्या पत्नीही होत्या. अलिकडील काळात विद्यार्थ्यांचा कल नाकरीकडे अधिक दिसून येतो. त्यापेक्षा व्यावसायिक क्षेत्राकडे वळल्यास प्रगती अधिक झपाट्याने होते असे प्रतिपादन मॅक्सवेल इंडस्ट्री लिमिटेड कंपनीचे चेअरमन मा. श्री. जय पठारे यांनी सांगितले. वाणिज्य मंडळाच्या उद्योजक आपल्या भेटीला या कार्यक्रमांतर्गत हा कार्यक्रम घेण्यात आला. ३०० कोटी रू.ची उलाढाल असलेल्या या कंपनीचे चेअरमन होण्यापर्यंत त्यांनी केलेला प्रवास अगदी सोप्या भाषेत त्यांनी कथन केला. सुरूवातीच्या काळी त्यांनी केलेली नोकरी, त्यातून मिळणारे उत्पन्न, त्यातून व्यवसायाकडे निर्माण झालेली ओढ व त्याचा विकास कसा होत गेला हे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जिवनाचा वापर व्यवसायात केला जाण्याच्या दृष्टिने कसा करता येईल की जेणेकरून सक्षमपणे व्यवसायात उभे राहता येईल हे विविध उदाहरणांसह स्पष्ट केले. सध्याच्या काळातील विद्यार्थी करिअरकडे पाहतांना धोक्याचा विचार करून व्यवसायापेक्षा नोकरीकडेच अधिक लक्ष देतात. त्यापेक्षा आपल्या व्यक्तिमत्वाचा प्रभावी वापर करून अनेकांना नोकरी देणारा व्यवसाय सूरू करून यामध्ये प्रगती करा असे आवाहन त्यांनी केले. व्यवसायापेक्षा येणारे अडथळे यावर कशाप्रकारे मात करावी हे देखील स्पष्ट केले. याबरोबर त्यांनी आपल्या आयुष्यातील व्यायाम व खेळाचे महत्व देखील स्पष्ट केले. सदर कार्यक्रमामध्ये त्यांच्या पत्नी सौ. ललिता पठारे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. सुशिल वेल्हाळ हेही उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. जालिंदर जाधव व समारोप प्राचार्य एस.एस. खोत यांनी केले.






# संगणक युगाचे मार्गदर्शन -जहूर बोट

दि.१३नोव्हेंबर २०१४ रोजी संगणक क्षेत्राविषयी माहिती देण्यासाठी युनिटेक संगणक एज्यूकेशनचे प्रमुख श्री. जहूर बोट हे आले होते. त्यांच्यासोबत त्यांच्या स्टाफ मेंबर कु. पल्लवी शेट्ये याही आल्या होत्या. भक्ती महाडिक या विद्यार्थीनींने त्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. प्रत्येक क्षेत्रात संगणकाचे महत्व असल्यामुळे, संगणकाच्या वाढत्या वापरामुळे या क्षेत्रात करिअरसाठी मोठी सुवर्णसंधी असल्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या क्षेत्राकडे वळावे असे आवाहन श्री. बोट सर यांनी केले. पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळातर्फे आयोजित संगणक क्षेत्रातील करिअर संधी या कार्यक्रमात ते बोलत होते. महाविद्यालयीन युवकांना शिक्षण घेत असतांना उपयुक्त विविध कोर्सेस कोणते व त्याचे स्वरूप, कालावधी, फी किती आहे हे त्यांनी स्पष्ट केले. प्रामुख्याने ऑफिस असिस्टंट, डेटा ॲनॉलिस्ट विथ एक्सेल, बिझनेस प्रेजेंटेशन स्पेशालिस्ट, मार्केटींग एक्जेक्युटिव, ग्राफिक डिझायनर, फोटो एडिटर, स्टेशनरी डिझायनर, डिटीपी ऑपरेटर या कोर्सेसची माहिती दिली. कु. पल्लवी शेट्ये यांनी देखील विविध प्रकारची माहिती विद्यार्थ्यांना दिली. सदर कार्यक्रमाचा प्रास्ताविक व समारोप प्राचार्य एस.एस. खोत यांनी केले.





# बँक आपल्या भेटीला - श्री. सुरनिस साहेब

दि.२९ नोव्हेंबर २०१४रोजी बँक ऑफ महाराष्ट्र, मार्गताम्हाणे शाखेचे मॅनेजर मा. श्री. सुरनिस साहेब हे बँक आपल्या भेटीला या कार्यक्रमामध्ये उपस्थित होते. त्यावेळी वाणिज्य मंडळाचे सर्व सदस्य व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. श्री. सुरनिस साहेबांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर आपल्या मार्गदर्शनात सुरनिस साहेबांनी चालू ठेवी खाते, मुदती ठेवी खाते तसेच बचत खातेदारांना देण्यात येणा-या सोई सुविधांची माहिती करून दिली. त्याचबरोबर डेबीट कार्ड व क्रेडीट कार्ड यांचा वापर कसा करावा व त्याचे फायदे काय आहेत हे त्यांनी अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. तसेच त्यांनी कर्जे कशाप्रकारे घेतली जातात व ती पुर्ण किती हप्त्यांनी करावी लागतात याबद्दल माहिती दिली. तसेच त्यांनी उच्च शिक्षणासाठी जर कर्ज काढायचे असेल तर त्याची माहिती सांगितली. म्हणजे एक ठरावीक रक्कम त्या व्यक्तिला दिली जाते. त्यानंतर त्या व्यक्तिचे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर काही वर्षांनी व्याजासह रक्कम हप्त्या हप्त्यांनी पूर्णकरावी लागते अशी माहिती दिली. त्यांनी त्यांच्या बँकेत असलेल्या मुलीचे उदाहरण सांगितले. बँकेमध्ये नोकरीला लागण्यासाठी काही परिक्षा द्याव्या लागतात. त्याची माहिती दिली. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व समारोप प्राचार्य एस.एस. खोत यांनी केले.








# उद्योजक आपल्या भेटीला - श्री. मोहनशेठ संसारे

दि.१२ दिसेंबर २०१४ रोजी शृंगारतळीचे उद्योजक श्री. मोहनशेठ संसारे हे आज पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे वाणिज्य मंडळआयोजित उद्योजक आपल्या भेटीला या कार्यक्रमांतर्गत उपस्थित होते. श्री. संसारे यांनी आपल्या जन्मदिवस २८ ऑगष्ट १९५८ पासूनची सर्व कहाणी आम्हाला सांगितली. त्यांचा जन्म एका व्यापारी कुटूंबातच झाला. त्यांनी शाळेचे शिक्षण घेत असतांनाच व्यापाराचेही शिक्षण घेतले. शाळेतून घरी न जाता ते सरळ दुकानात जाऊन दुकान सांभाळत असत. त्यांनी अभ्यासाचे नियोजनही शाळेच्या दिवसात योग्य प्रकारे केले. मोठेपणी आपल्या व्यवसायाचा विस्तार केला व हा विस्तार आजही वाढविण्याच्या ते तयारीत आहेत. आपल्या मुलांनाही चांगले शिक्षण दिले. पुढे मुलाने बिझनेस मॅनेजमेंट करून वडिलांचा व्यवसाय वाढवण्यास मदत केली. या व्यवसायातून लोकांना रोजगार प्राप्त करण्यासाठी मदत केली. अशा प्रकारे आपल्या व्यावसायिक आयुष्य त्यांनी उलगडले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार कु. कविता चव्हाण हिनेमानून कार्यक्रमाची सांगता झाली.





# उद्योजक आपल्या भेटीला - श्री. राजन दळी

दि. १६ दिसेंबर २०१४ रोजी गुहागर तालुक्यातील धोपावेचे प्रसिध्द व्यापारी श्री. राजन दळी हे आज पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे वाणिज्य मंडळ आयोजित उद्योजक आपल्या भेटीला या कार्यक्रमांतर्गत उपस्थित होते. त्यांचे कृपा हेअर टॉनिक हे औषध प्रसिध्द आहे. ते विठ्ठल कामत यांना आपले आदर्श मानतात. त्यांनी कामतांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून व्यवसायाला सुरूवात केली. त्यांनी आपल्या छोट्याशा गावात कृपा हेअर टॉनिक या तेलाची फॅक्टरी उघडली. अवघ्या १००००० रू. कर्जाचा भरवशावर आपल्या व्यावसायिक आयुष्याची सुरूवात केली. सकारात्मक दृष्टिकोण मानवाच्या जिवनात फार मोठा असतो. तो आपल्याला व्यवसाय उभारतांना उपयोगी ठरतोच जिवनातील इतर टप्प्यांवरही उपयोगी पडतो. व्यवसाय करतांना विविध अडचणी येतात पण अडचणींना सामोरे जाऊन जो काम करतो तो खरा माणूस असतो. श्री. दळी आपल्या व्यवसायानिमित्त संपुर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. आज त्यांचे औषध संपुर्ण देशभर प्रसिध्द आहे. या व्यवसायामुळे त्यांना जवळ जवळ २५ वर्षे मोठ्या कष्टाने प्रयत्न करून व्यवसाय उभा केला. हा व्यवसाय उभारण्यासाठी त्यांनी किती कष्ट उपसले हेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन कु. रोहित जाधव यांनी केले.






# जागो ग्राहक जागो - श्री. चंद्रकांत झगडे

बुधवार दि. १८ डिसेंबर २०१४ या दिसशी महाविद्यालयातील वाणिज्य मंडळाच्या वतीने पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे जागो ग्राहक जागो या कार्यक्रमांतर्गत प्रबोधन सत्र घेण्यात आले. सदर विषयाचे मार्गदर्शन करण्यासाठी रत्नागिरी जिल्हा ग्राहक मंचाचे सचिव श्री. चंद्रकांत झगडे यांना पाचारण करण्यात आले होते. २४ डिसेंबर हा ग्राहक दिवस म्हणून साजरा केला जातो. या निमीत्ताचे औचित्य साधून सदर कार्यक्रमाचे वाणिज्य मंडळाने आयोजन केले. आपल्या मार्गदर्शनामध्ये श्री. झगडे यांनी ग्राहक म्हणजे कोण ते तक्रार करतांना काय काळजी घ्यावी इथपर्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. १९८६ ला लागू झालेला ग्राहक संरक्षण कायदा विस्ताराने त्यांनी स्पष्ट केला. समाजामध्ये ग्राहक म्हणून वावरत असतांना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी कोणती काळजी घ्यावी याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले. सदर मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांमधील ग्राहक जागा झाल्याचे जाणवले. या प्रश्नोत्तरात्मक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. सुभाष खोत, एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. लंकेश गजभिये, प्रा. शिंधे, वाणिज्य मंडळाचे पदाधिकारी यांनी प्रयत्न केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन वाणिज्य मंडळाचे अध्यक्ष कु. जिज्ञेश पटेल यांनी केले.





# उद्योजक आपल्या भेटीला - श्री. शाळीग्राम खातू

बुधवार दि. २१ डिसेंबर २०१४ या दिसशी महाविद्यालयातील वाणिज्य मंडळाच्या वतीने पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे गुहागर तालुक्यातील प्रतिष्ठित उद्योजक श्री. शाळीग्राम खातू हे व्याख्यान देण्यासाठी आले. यावेळी त्यांच्यासोबत मंचावर देवरूख महाविद्यालयाचे श्री. मगदूम सरही उपस्थित होते. आलेल्या सर्व पाहूण्यांचे स्वागत प्राचार्य खोत यांनी केले. श्री. खातु यांनी आपल्या व्याख्यानात आपल्या व्यावसायिक जिवनाची संपुर्ण कहाणी सांगितली. ते कसे घडत गेले ते सांगितले. त्यातून उद्योजक कसा बनतो हे उमगले. खातु सरांनी लहान वयापासूनच खुप मेहनत घेतली. त्यांच्याकडे असलेल्या अफाट जिद्दीमुळे आज ते मोठे व्यावसायिक बनले. त्यांनी बाळगलेली जिद्द प्रत्यक्षात उतरवली. त्यांनी सांगितलेले आपले जिवनातील अनुभव सर्व मुलांना सांगितले. खातु सरांनी सुरूवातील खुप वेगवेगळे उद्योग करून बघितले. नंतर त्यांनी मसाल्यांच्या उद्योगात उडी घेतली. त्यांनी त्यात रोख व्यवहार केले. हे त्यांचे चांगले वैशिष्ट्य आम्हाला कळले. आणि आपला व्यवहार जर रोख असेल तर दुस-यांचा विश्वससही जिंकता येतो हे ते ठासून सांगतात. व्यवसायातील चांगल्या तसेच वाईटही अनुभवातून ते पुढे धडा घेत शिकत गेले. त्यातुनच ओढवलेल्या समस्यांना तोंड देण्याची हिम्मतही त्यांच्यात आली. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन कु. वृषाली पेंडुरकर हिने केले.



# पत्रकार दिन साजरा

दि. ६ जानेवारी २०१५ रोजी पत्रकार दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये पत्रकारांचासत्कार करण्याचा समारंभ आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयाचा वाणिज्य मंडळातर्फेपार पडला. या कार्यक्रमाला गुहागर तालुक्यातील सुमारे २५ पत्रकार उपस्थित होते. सदर कार्यक्रमाला संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. सुजाता चव्हाण, प्राध्यापक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुमार रोहित जाधव याने केले. सौ. चव्हाण मॅडमच्या हस्ते सर्व पत्रकार बंधुंना शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन त्यांना गौरविण्यात आले. तसेच आमच्या वाणिज्य मंडळाचे सदस्य कुमार अभिषेक खांडके याचेही पत्रकार म्हणून स्वागत करण्यात आले. सदर कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. या सत्कार समारंभासाठी विविध पत्रकारांनी आपले मनोगत व्यक्त करून पत्रकारितेमधील करिअरविषयी माहिती दिली.






# खाद्यमहोत्सव (वर्ष तिसरे)

दि.११ फेब्रुवारी २०१५ रोजी महाविद्यालयातील वाणिज्य मंडळाचा सर्वात मोठा उपक्रम म्हणजे खाद्यमहोत्सव आयोजित करण्यात आला व तो यशस्वीरित्या संपन्न झाला. गेल्या तीन वर्षांपासुन हा उपक्रम महाविद्यालयात वाणिज्य मंडळातर्फे राबविण्यात येत आहे. विविध पदार्थांची रेलचेल या खाद्यमहोत्सवात होती. विशेष म्हणजे सर्व पदार्थ विद्यार्थ्यांनी तयार केले होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांचे पर्यटन कौशल्य, घटना व्यवस्थापन, जाहिरात कौशल्य, व्यावसायिक कौशल्य, पाककृती, विपणन कौशल्य इ. कौशल्य वृध्दिंगत व्हावे म्हणून हा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. या प्रकारच्या महोत्सवामधून विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख बनविण्याचे प्रयत्न केले जातात. ग्रामीण कोंकण दर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी गवताची झोपडी, शेती, बैलगाडी, वाडीवस्तीवरील मंदिर, गुरांचा वाडा, शेती, शेततळे, मत्स्य पालन, मळा इ. दाखविण्यात आले. या महोत्सवाला भेट देणा-यांनी हे कोंकणी दर्शन पाहुन विद्यार्थ्यांच्या कौशल्याची स्तुती केली. या दर्शनाने प्रत्येक जन हे दृष्य पाहून भारावून गेले. या खाद्यमहोत्सवात विविध भारतीय व विदेशी पदार्थ उपलब्ध होते. पाटपन्हाळे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. भालचंद्रजी चव्हाण यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. यावेळी संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. सुजाता चव्हाण, मुख्याध्यापक श्री. बापट, अनेक पत्रकार, वार्ताहर, ग्रामस्थ, प्रसिध्द व्यापारी श्री. मालाणी, श्री. खातू, श्री. दळी, श्री. सुशिलशेठ वेल्हाळ, लता मंगेशकर यांचे बंधू डॉ. दिनेश मंगेशकर उपस्थित होते. या खाद्यमहोत्सवामध्ये एकूण ३२ प्रकारचे खाद्यपदार्थ विद्यार्थ्यांनी तयार केले. सकाळी ०९.०० ते दुपारी ०१.०० या वेळेत सुमारे रू. १,००,००० ची विक्री करण्यात आली.














OFFICE



# सोशल मिडिया वापरतांना घ्यावयाची काळजी कार्यक्रम

दि. ११ फेब्रुवारी २०१५ रोजी महाविद्यालयातील वाणिज्य मडळाच्या वतीने महाविद्यालयात सोशल मिडिया वापरतांना काय काळजी घ्यावी यासंबधी माहिती देणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. गुहागर पोलिस स्टेशन व पाटपन्हाळे महाविद्यालयाने हा उपक्रम संयुक्तरित्या राबविला. सदर उपक्रमामध्ये ७‘‘४ चे फ्लेक्स बनविण्यात आले. या फ्लेक्सचे उद्घाटन पाटपन्हाळेचे पोलिस पाटील श्री. सत्यप्रकाश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच २००० माहितीपत्रक तयार करण्यात येऊन ते तालुक्यामध्ये वितरीत करण्यात आले.






